महाराष्ट्र शासन

क्र.एफएलडी-२०२२/प्र.क्र.१२०(अ)/ फ-१०

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :२४.०६.२०२२

**प्रति,**

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर

**विषय: वनजमीन- सातारा**
मध्य रेल्वेच्या Holiday Home साठी महाबळेश्वर येथील १.५४५७ हे. वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करणेबाबत

**संदर्भ:** केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. Desk-17/ Nodal/ Kolhapur/(29)/ I.D.13267/ 436/2022-23, दि.26.05.2022

आपल्या कार्यालयाच्या संदर्भीय पत्रान्वये मध्य रेल्वेच्या Holiday Home साठी महाबळेश्वर येथील १.५४५७ हे. वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करण्यासंदर्भातील प्रस्ताव केंद्रीय पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालयाच्या नागपूर येथील प्रादेशिक कार्यालयास सादर केला आहे.

२. प्रस्तुत प्रकरणी प्रकल्प यंत्रणेने भाडेकरार संपल्यानंतर वनजमीन वन विभागास परत करणे अपेक्षित होते. प्रकल्पाचे बांधकाम वन (संवर्धन) अधिनियम, १९८० लागू झाल्यानंतर झाले आहे. प्रस्तुत प्रकरणी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० चा भंग झाला आहे. त्यासाठी केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाची परवानगी घेण्यात आलेली नाही. प्रकल्प यंत्रणेने कार्योत्तर (Ex-post facto approval) मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केला आहे. कोणत्याही वनजमिनीचा वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वनेतर वापर करण्यासाठी ते प्रयोजन मूळत: स्थळ विवक्षित (Site Specific) व अपरिहार्य स्वरूपाचे असणे आवश्यक आहे. स्थळ विवक्षित नसलेले प्रकल्प (non-site Specific projects) वनजमिनीवर उभारण्याकरीता प्रस्ताव सादर न करण्याच्या केंद्रीय पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालयाच्या सूचना आहेत. सदर जागा आता Mahabaleshwar Eco-Sensitive Zone, Western Ghats ESA, Eco Region मध्ये मोडत असून Holiday Home मधील सांडपाणी वेण्णा लेक मध्ये जाऊन प्रदूषण होत असल्याची तक्रार

शासनास प्राप्त झाली आहे. वरील पार्श्वभूमीवर खालील मुद्यांच्या अनुषंगाने आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय शासनास सादर करावेत:-

- प्रस्तुत प्रकरणी झालेल्या वनभंगाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील
- केंद्रीय पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालयाच्या दि.२२.०३.२०२२ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनूसार वनभंग झालेली प्रकरणे केंद्रीय पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालयाच्या नवी दिल्ली येथील मुख्यालयास सादर करणे अभिप्रेत असताना सदर प्रस्ताव नागपूर येथील प्रादेशिक कार्यालयास सादर करण्याची कारणमिमांसा
- उपलब्ध कागदपत्रांवरून सदर प्रकल्प स्थळ विवक्षित (Site Specific) नसल्याचे दिसते. तसेच भाडेपट्टा वाढविणे वा तत्सम प्रकरणी राज्य शासनाची मान्यता / मंजूरी प्राप्त करणे आवश्यक आहे, असे असताना राज्य शासनाला अवगत न करता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रस्ताव परस्पर केंद्र शासनास सादर करण्याचे प्रयोजन

कृपया वरील बाबत शासनास अवगत करावे.

**(गणेश जाधव)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव:**

१. अपर मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, नागपूर
२. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे
३. उपवनसंरक्षक, सातारा

## Government of Maharashtra

By Speed Post

No. FLD-2022/C.R.120 (A)/F-10
Revenue and Forest Department,
Mantralaya, Mumbai- 400 032.
Date: 24/06/2022

To,
Regional Officer (Central),
Integrated Regional Office,
Ministry of Environment, Forests & Climate Change,
Government of India,
Civil Lines, Nagpur-440 001.

Sub.:- **Forest Land-Satara**
Proposal for diversion of 1.5457 ha. of Forest land for regularization of lease of Forest Land (Before 1980) for use of Holiday Homes with drinking water pipeline, water tank, electricity, internal roads, parking & other amenities from survey no. 223/1 at Village-Malcompeth, Tal-Mahabaleshwar, Dist. Satara in favour of Central Railway, Pune

Ref: Addl. Principal Chief Conservator of Forests, MS, Nagpur letter No.Desk-17/Nodal/Kolhapur/(29)/ID-13267/436/2022-23, Dt.26.05.2022.

Addl. Principal Chief Conservator of Forests, MS, Nagpur has submitted proposal for diversion of 1.5457 ha. of Forest land under Forest (Conservation) Act, 1980 for regularization of lease of Forest Land for use of Holiday Homes with drinking water pipeline, water tank, electricity, internal roads, parking & other amenities from survey no. 223/1 at Village-Malcompeth, Tal- Mahabaleshwar, Dist. Satara.

It is requested to **keep this proposal in abeyance till further communication** from the State Government.

**(Ganesh Jadhao)**
**Under Secretary to the Government**

Copy to:
1) Principal Chief Conservator of Forests (HoFF), MS, Nagpur
2) Additional Principal Chief Conservator of Forests and Nodal Officer, MS, Nagpur.
3) Chief Conservator of Forests (T), Kolhapur
4) Deputy Conservator of Forests (T), Satara.
5) Select File F-10.